**महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित**
**ग्राहक तक्रार निवारण मंच**
**कोल्हापूर परिमंडळ, कोल्हापूर**

MAHADISCOM
Maharashtra State Electricity Distribution Co. Ltd.

सं.क्र.काअ/ग्रातनिमं/कोप/केस क्र. २७/२०१७-१८/३०० दिनांकः १६.१०.२०१७

**आदेश**

**आदेश केस क्र. २७/२०१७-२०१८**

| | |
|---|---|
| ग्रंथपाल श्री आनंदराव दत्तात्रय शिंदे<br>महात्मा फुले मोफत वाचनालय, बोरगांव<br>ता. वाळवा जि. सांगली | **तक्रार**<br>**अर्जदार**<br>**(ग्राहक)** |
| **विरुध्द** | |
| १) कार्यकारी अभियंता (का) तथा नोडल ऑफीसर,<br>महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित,<br>मंडल कार्यालय, सांगली<br>३) कार्यकारी अभियंता<br>महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित,<br>विभागीय कार्यालय इस्लामपूर<br>४) उपकार्यकारी अभियंता<br>महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित,<br>उपाविभाग इस्लामपूर-एक | **विरुध्द पक्षकार** |

**कोरमः-** १.श्री. प्र.वि. खपली, सदस्य सचिव,
२. श्री. पी. एस. बुरांडे, ग्राहक सदस्य,

CONSUMER GRIEVANCE REDRESSAL FORUM, KOLHAPUR ZONE
MAHARASHTRA STATE ELECTRICITY DIST. CO. LTD.
महावितरण

महाराष्ट्र राज्य विद्युत नियामक आयोग
(ग्राहक तक्रार निवारण मंच व विद्युत लोकपाल)
विनियम २००६ मधील ८.२ चे तरतुदीनुसार .

**न्याय निर्णय**

मी प्रदिप वि. खपली , सदस्य सचिव, ग्राहक तक्रार,निवारण मंच. कोल्हापूर, खालीलप्रमाणे - न्याय निर्णय देत आहे.

## तक्रारीचे स्वरुप व ग्राहकाची मागणी

ग्रंथपाल श्री आनंदराव दत्तात्रय शिंदे, महात्मा फुले मोफत वाचनालय, बोरगांव ता. वाळवा जि. सांगली यांनी अ फॉर्ममध्ये कोल्हापूर मंचाकडे अर्ज करुन जुना ग्राहक क्रमांक २८४१४०२३३३५ हे कनेक्शन बंद करतेवेळी २३४ इतकी अधिक रक्कम घेतली होती ती परत करावी तसेच डिसेंबर २०१३ मध्ये की, विज पुरवठा बंद केला त्यावेळी बिल रु. १,३२२.४७ आहे. यातून रु. २३४/- वजावाट करुन उर्वरीत रक्कम भरणेस तयार आहे. महावितरणचे नियमानुसार योग्य ती दंडात्मक कारवाई कसूरदार यांचेवर करावी. अशी मागणी केली आहे.

अंतर्गत तक्रार निवारण कक्षाने निकालानंतर काही रक्कम अद्याप महावितरणकडे शिल्लक आहे. ती समायोजित करावी. अशी ग्राहकाने मागणी केली आहे. ग्राहक स्वतः सुनावणीस आज दि. १२.१०.२०१७ रोजी उपस्थित नव्हते. मा. प्रभारी अध्यक्ष (सदस्य सचिव) व मा. ग्राहक सदस्य यांचे बरोबर त्याचे भ्रमणध्वनीवर बोलणे झाले तेथे त्यानी मागणी नुसार रु. २३४/- परत मिळावेत असे सांगितले त्यावर आम्ही वि.प. बाजू ऐकून  घेऊन योग्य ती रक्कम समायोजित करीत आहोत असे ग्राहकास सांगितले ग्राहकाने त्यास मान्यता दिली आहे.

## वितरण कंपनीची भूमिका

१) महात्मा फुले मोफत वाचनालय बोरगांव ता. वाळवा ग्राहक क्र. २८४१४०००३१८१ या विज जोडणीच्या थकीत बाकी अभय योजनेचा लाभ घेऊन ग्राहकाने रु. ११३०/- भरले आहेत आणि ग्राहकाचा विद्युत पुरवठा ही सुरु आहे. असे नमूद केले आहे.

पूर्वीचा ग्राहक क्रमांक २७४१४००२३३३५ यावर रु.१२०/-जमा दिसत आहे असे आपल्या लेखी उत्तरात आणि तोंडी ही हीच माहिती दिली. त्यानी रु. २३४/- शिल्लक नसलेचे सांगितले. जमा बाकी मंचाने आदेशीत केल्यास जमा ठेव पावतीचा आग्रह न धरता आम्ही समायोजित करु असे मान्य केले.

सर्व कागदपत्रांचे वाचन ग्राहकाशी फोनवर बोलणे आणि मंचा समोरील चर्चा याच्या विचारांती खालील प्रश्न उपस्थित होतात.

१) ग्राहकाची मागणी मान्य करता येईल का?
उत्तरः- होय, नियमाप्रमाणे
२) महावितरण वर मानसिक त्रास व विलंब याबद्दल दंडात्मक कारवाई करता येईल का?
उत्तरः- नाही.

CONSUMER GRIEVANCE REDRESSAL FORUM, KOLHAPUR ZONE
MAHARASHTRA STATE ELECTRICITY DIST. CO. LTD.
महावितरण

## कारणमिमांसा

२) वि.प.चे अधिकारी आणि ग्राहक यांच्यामध्ये अंतर्गत तक्रार निवारण कक्ष, सांगली यांचा निकाल लागल्यानंतर सखोल चर्चा होऊन अभय योजनेचा लाभ देऊन गाहकाकडून नियमाप्रमाणे थकबाकी भरुन घेतली आहे. त्यामुळे ग्राहक क्र. २८४१४०००३१८१ या बाबतचा प्रश्न सोडविला गेला आहे.

पूर्वीच्या ग्राहक क्र. २७४१४००२३३३५याची जुलै २०१२ मध्ये ९२६ थकबाकी होती त्याला अभय योजने अंतर्गत रु. ४०९ लाभ मिळाला या जोडणीपोटी गा्रहकाने अनामत रु. ६४०/- एवढे होते.

१) (थकीत) ९२६ -(लाभ) ४०९ = ५१७ देय रक्कम

२) (अनामत रक्कम ) ६४० - ५१७( देय रक्कम ) = १२३ देणे रक्कम

असा साधारण पूर्ण रुपयात हिशोब होतो.

ग्राहकाने या हिशोबात वसूली केलेले व्याज इतर आकार याचा समावेश देय रक्कमेत करावा अशी विनंती केली आहे. त्यामुळे रु. २३४/- येतात असे ग्राहकाचे म्हणणे आहे. यावर ग्राहकाशी चर्चा करुन व वि.प. बाजू ऐकून नियमाप्रमाणे आदेश देण्यात येत आहे. आणि जुन्या विज जोडणीचे रु.१२३/- (एकशे तेवीस मात्र) पुढील देयकात समायोजित करण्यात यावे असे मंच सूचित करीत आहे. इतर आकार, मानसिक त्रास विलंब याचा विचार करता येणार नाही असे मंचास वाटते.

**आदेश**

१) रु. १२३/- (एकशे तेवीस फक्त) पुढील देयकात माहे डिसेंबर २०१७ पूर्वी समायोजित करावेत.

२) सदर आदेशाची अंमलबजावणी केल्याचे महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (ग्राहक तक्रार निवारण मंच व विद्युत लोकपाल ) विनियम २००६ ८.७ नुसार वि.प. यांनी मंचास कळवावे.

३) या निर्णयाविरुध्द तक्रारदार यांना अपील करावयाचे असलेस त्यांना आदेशाच्या तारखेपासून ६० दिवसांचे आंत मा. विद्युत लोकपाल, केशवा. बांद्रा-कुर्ला कॉम्प्लेक्स, बांद्रा (पूर्व) मुंबई यांजकडे करता येईल.

एकमताच्या / बहुमताच्या आदेशाची अंमलबजावणी करण्यात यावी.

दिनांक ०१.०७.२०१७ पासून अध्यक्ष पद रिक्त आहे.

16/10

(श्री प्र. स. बुरांडे)
ग्राहक सदस्य

(प्र.वि. खपली)
सदस्य सचिव

CONSUMER GRIEVANCE REDRESSAL FORUM, KOLHAPUR ZONE
MAHARASHTRA STATE ELECTRICITY DIST. CO. LTD.
महावितरण